ISSN: 2249-894X IMPACT FACTOR : 5.2331(UIF) VOLUME - 6 | ISSUE - 11 | AUGUST - 2017

REVIEW OF RESEARCH

# ऐकीव रचना प्रकारातील कल्पनाबंध

**प्रा.डॉ. महादेव देशमुख**
**संगमेश्वर कॉलेज, सोलापूर.**

*सारांश*

भेदिक कवितेमध्ये विविध रचनाप्रकार आहेत. काही रचनाप्रकार सादरीकरणाच्या दृष्टीने बेतलेली असतात. उदा. गण, गवळण, पदे, साकी, गर्भावळीची, बीर, कंगण, या रचना आणि ऐकीव रचनाप्रकार शाहीर दोन भागात भेदिक फडात सादर करतात. पूर्वरंगातील रचनांचे स्वरूप आणि सादरीकरण मध्यरात्रीपूर्वीच असते आणि उत्तर रंगातील ऐकीव रचनाप्रकार मध्यरात्रीनंतर सादर केला जातो. याचे स्वरूप हे गद्पद्यमिश्रित असते आणि हा रचना प्रकार चार–पाच शाहीर सादर करतात. या शाहिरांना भेदिक शाहीर म्हणून ओळखले जाते. यांना काही ठिकाणी कलगी शाहीर तर तुरा शाहीर म्हणून ओळखतात. या शाहीरांकउे ज्या रचना असतात त्यातील विषय अध्यात्म, धार्मिक, लौकिक, ऐतिहासिक, पौराणिक असे असतात. ऐकीवाचे वर्गीकरण पौराणिक, सामाजिक, चरित्रात्मक, लोककथात्मक अशा विभागात केले जाते. या ऐकीवामधून सामाजिक घटनेवरील मार्मिक भाष्य व मार्गदर्शन केलेले असते. तसेच त्यामध्ये प्रबोधनपर ऐकीव आणि रंजनपर ऐकीव अशा स्वरूपात असतात. आपण दोनही प्रकारच्या ऐकीवांचा विचार येथे करणार आहोत. ऐकीवामधून समकालीन स्थितीचे वर्णन आलेले असते. ऐकीवांची भाषा प्रचलित परभाषीय शब्दांचा वापर करून समृद्ध असते. शब्द आणि भाषा यामुळे सहजगत्या आशय समजतो. अशा ऐकीवामध्ये ज्या विविध विषयाच्या कथा येतात त्यातून रंचन आणि बोधाची शिकवण हा हेतू दिसून येतो. अशाच कथांमधून कल्पनाबंध (Motif) आढळतो. ऐकीवाच्या आधारे पाहता येईल. त्याअगोदर आपण कल्पनाबंध म्हणजे काय पाहू. एखाद्या कथेमध्ये कथानकाची जी वैशिष्ट्ये दिसून येतात आणि त्या कथेची वैशिष्ट्ये आणि ठराविक घटनेत झालेली असतात, तसेच कथेतील प्रसंग आणि संकेत यांची जी चौकट ठरलेली असते त्यातील समानकथा, घटकांनाच (Motif) या इंग्रजी शब्दाचा अर्थ कल्पनाबंध असा आहे. हा तपासण्यासाठी विविध देशातील लोकसाहित्याचा भौगोलिक, सांस्कृतिक आणि कालिक अशा प्रकारचे विशेष एका बाजूला काढले आणि त्यातील शाश्वत आणि सार्वत्रिक मनःप्रवृत्तीच्या भागाचे विश्लेषण केले त्याला आदिबंध असे म्हणतात. या आदिबंधाला सी.जी.युग. यांनी (A kind of unconscious idea) अशी कल्पना असते अस म्हटले. याचाच अर्थ असा आहे की, एखादी कल्पना असते ती विकसित व आदर्शपणे व्यक्तीच्या मनात येते आणि हीच कल्पना सामूहिक सांस्कृतिक परंपरा जाणिवेच्यादृष्टीने ती साकारते. यामुळेच सी.जी. युंग पुढील विश्लेषण करतात. लोककथा, परीकथा, दैवककथा म्हणजे आदिबंधाचे आविष्कार होय. आदिबंध हे स्थल व काल अशा सिमितदृष्टीने आढळतात. कल्पनाबंध त्या त्या समुहाच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिकतेने चित्रित झालेले असतात. युंग पुढे म्हणतात, कल्पनाबंध हा पुनरार्वित होणारा मानसिक, समूह अनुभवाचा गूढ वारसा असतो. हाच वारसा ज्याचा पणिम समाजातील प्रत्येक व्यक्तींच्या मेंदूवर खोल कोरला गेलेला असतो त्यामध्ये समूहाचा झगडा, विजय, पराभव, विकास, आशा, निराशा, याचा अनुभव येतो. येथे समूह मनाचा आविष्कार या कल्पनाबंधामध्ये आढळतात. हेच समाजाच्या

मानसिकतेचे निदर्शक ठरतात. एवढेच नव्हे तर कल्पनाबंधामध्ये आदिम संस्कृतीची प्रतीके दिसतात. त्यांना मिथ म्हटले आहे. आणि या मिथकामध्ये आदिबंध दिसतो. कल्पनाबंधाचे बीजभूततेचे गुणधर्म आढळतात. याहीपेक्षा स्थल कालाच्या भाषेच्या मर्यादा ओलांडून ते विकसित झालेले आहेत. कल्पनाबंधामध्ये वेगवेगळे आकार धारण करण्याची क्षमता असते, एवढेच नव्हे तर अनेकार्थ व्यक्त करण्याची क्षमताही असते. आपणास बाह्यतः विरोधी वाटणारे पण एकाच प्रेरणेने युक्त असे वर्तनविशेष किंवा भावविशेष या कल्पनाबंधामध्ये दिसतात. काही कल्पनाबंधनामध्ये कालप्रवाहितपणा दिसतो. अनेक वर्षापूर्वीच्या समूहजीवनाचे अवशेष सापडतात. त्या समूहाच्या जीवनशैलीचेही दर्शन घडते. यासाठी गिलबर्ट मरे यांचे मत संयुक्तीक वाटते. तो म्हणतो, आपल्या शरीराचा अवयव असावा तसे जे समूहजीवनाचे संस्कार आपल्यावर असतात, त्याच्याशी या शब्दांनी, भाषेचे थेट संपर्क साधला जातो. अनेक वर्ष सूप्त असलेले आणि ते ते पूर्ण परिचयाचे भावजीवनाच्या मूळाशी पडून असलेले आणि जादूभरे स्वप्नांच्या धाग्यात बेमालूम मिसळलेले आणि भावानुभवांचा अंतःस्तरावरील प्रवाह दिसतो. यावरून आपणाला आदिबंध व कल्पनाबंधामध्ये समान वैशिष्ट्ये स्पष्टपसे दिसून येतात. या संदर्भात मराठी लोकसाहित्यांचे अभ्यासक डॉ. प्रभाकर मांडे म्हणतात, आदिबंध हे कथाविशेष तर कल्पनाबंध हे कथाबीज आहेत. डॉ. मांडे यांच्यामते कथाबीज आणि कथाविशेषांमध्ये फरक आहे. यासाठी आधार म्हणून स्टिथ थॉम्सनचे मत प्रभाकर मांडे पुढे देतात, पारंपारिक कथेचे स्वरूप संपूर्णतथा स्वतंत्र असून, अन्वय लावण्यास कोणत्याही इतर कथेची जरूर पडत नाही, त्या कथेला कथाविशेष म्हणावे अशा कथेत एक किंवा अनेक कल्पनाबंध असून कशतात. याइिकाणी कथानकांच्या घटकांमधूनच कल्पनाबंध व्यापलेला असतो. तसेच कल्पना बंधाविशवायही लोककथा असू शकतात. लोककथांमध्ये वेगवेगळे कल्पनाबंध असतात. तशाच प्रकारचे भेदिक कल्पनाबंधाचे पुढील वर्गीकरण पाहू.

१) स्वप्नाचा कल्पनाबंध, २) चमत्काराचा कल्पनाबंध, ३) मृत–जिवंताचा कल्पनाबंध, ४) प्राणी व पक्षी यांची भाषा आणि मदतीचा कल्पनाबंध, ५) देवांचे मानवांना साहाय्य, ६) पातिव्रत्याचा कल्पनाबंध, ७) कपट व सुडबुद्धीचा कल्पनाबंध, ८) जादू मंत्राचा कल्पनाबंध, ९) फसवणक व व्यचिराचा कल्पनाबंध, १०) साहस व पराक्रमाचा कल्पनाबंध, या वर्गीकरणातून आपण उपलब्ध ऐकीवाच्यामध्ये जे कथाविशेष आहेत. त्याचा विचार करणार आहोत.

**पौराणिक ऐकीव :–** १ राजा हरिश्चंद्राची लावणी, २ श्रीयाळ चांगुनाची लावणी, ३ भिल्लीनीची लावणी, ४ नागावंतीची लावणी, ५ लवकुंश आख्यान, ६ सितेचा शोक, ७) परशुराम जन्मकथन, ८ नलदमयंती स्वयंवराख्यान.

**चरित्रात्मक ऐकीव :–** १ नामदेवाच्या लग्नाची लावणी, २ कमाल कबीर, ३ जैतूनबी लावणी.

**लोककथात्मक ऐकीव :–** १ छेलबटाऊ मोहनाराणीची लावणी, २ भोजराजाची लावणी, ३ निळावंतीची लावणी.

**सामाजिक ऐकीव :–** १ काशीबाईची लावणी, २ बापूची लावणी, ३ संपूर्ण लावणी पाटलीनीची, ४ बहिणीने मारीला भाऊ.

विविध प्रकारचा कल्पनाबंध दिसतो. राजा हरिश्चंद्राची लावणी या ऐकीवामध्ये हरीश्चंद्र नायक पुराणकथेतील थोर आदर्शवादी व सत्वनिष्ठ राजा त्याचे स्वप्न पाहण्यासाठी विश्वामित्र ब्राह्मणचा वेश परिधान करून राजा हरीश्चंद्राच्या स्वप्नांत जातो. ब्राह्मणाला आपले सगळे राज्य दान, आपण आपली पत्नी व मुलगा काशी यात्रेला निघालो असे स्वप्न पडते. काशीबाईच्या लावणीमध्ये सासू–सासऱ्याच्या स्वप्नात शामसुंदर नावाचे तिचे बाळ येते तर बहिणीने मारीला भाऊमध्ये बहिणीने भावाला ठार मारून त्याचे शरीराचे तुकडे रांजणात घालून भिंतीत लपविते हा सगळा प्रकार आईच्या स्वप्नात येतो आणि ती व्याकूळ होते.

नामदेवाच्या हातून नैवद्य स्विकारणे, कुभांड रचणे, कुत्रा, पोपट, कोंबडा इत्यादी प्राणी व पक्षांमध्ये रुपांतर होणे नागवंतीची लावणीमध्ये फूल तोडताच शेषनाग मृत्यू. पुढे अमृत शिंपनाने पुन्हा जिवंत होणे असे चमत्कार. मृत जिवंताचा कल्पनाबंधमध्ये कमाल–कबीर यामधून कमालच्या मृत शरीराचा अवमान संतमंडळी दिसतात, पुन्हा जिवंत, श्रीयाळ चांगुणा मध्येही चिलिया बाळाचे मृतशरीर जिवंत, परशुराम जन्मकथनमध्ये रेणुकाचे मृतशरीर जिवंत, छेलबटाऊंशी मोहनाराणीचे जारकर्म बटाऊचा खून, राजा हे राज्य सोडून फकीर. पुढे शंकरपार्वतीच्या आशिर्वादाने बटाऊचे जिवंत. अशाप्रकारचे कल्पनाबंध अनेक ऐकीवामध्ये पहावयास मिळतात.

भेदिक शाहिरांकडे अशा गद्यपद्यमिश्रित रचना विपुल प्रमाणात आहेत. रचनांमधून विविध प्रकारचे कल्पनाबंध मधून दिसून येतात.

**संदर्भ :–**

१– सी.जी. युंग, फोर आर्किटाईप्स रोलेस ॲण्ड केगेन पॉल, लंडन अनुवादित आवृत्ती, पुनर्मुद्रित १९७४, पृ. १३.

२– सी.जी. युंग, उनि. पृ. ४ (प्रस्तावना)

३– सी.जी. युंग, ऑल दि रिलेशन ऑफ ॲनालेटिक सायकॉलॉजी पोएटिक आर्टस् आर्किटाईप्ड पॅटर्सइन ट्रॉजिक पोएट्री वाय माऊंड बॉटकिन ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस. १९६८.

४– गिलबर्ट मरे, हॅम्लेट ॲण्ड ऑरेस्टस फाईव्ह ॲप्रोचेस लिटररी, क्रिटीसिणम कॉलिअर बुक्स न्युयॉर्क १९६२.

५– प्रभाकर मांडे, उनि.पृ. ५५ स्टिथ थॉमसनचे मत उदधृत.

६– शाहीर दादाभाई शेख : डोणज, मंगळवेढा यांच्या हस्त लिखितातून ऐकीव यांचे संकलन.